माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५मधील कलम १८(१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक: ९२/२०२३**

| तक्रारकर्ता | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपीलीय अधिकारी** |
| श्री. फय्याजुल हसन वल्द मोहम्मद शब्बीर, रा. २७९, मोमिनपुरा, अब्दुल अजिज कॉम्प्लेक्स समोर, जि. नागपूर | कार्यकारी अभियंता, (प्र.), नाशमं, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., सदर, नागपूर | अधीक्षक अभियंता, नाशमं, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., सदर, नागपूर |

## सुनावणी दिनांक २७.०३.२०२५

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार व्दितीय अपील क्र. १२७३/२०२० मध्ये दिनांक २३.०६.२०२२ रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रारीवर आज दिनांक १६.१२.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली असून पुनश्च: सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, गड्डीगोदाम, नागपूर श्री. अभिजीत सुर्यवंशी उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, गड्डीगोदाम, नागपूर श्री. अमीत परांजपे उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधीलकलम १९ (३) नुसार आयोगात दाखल केलेल्या व्दितीय अपील क्र. १२७३/२०२० मध्ये दिनांक २३.०६.२०२२ रोजी सुनावणी घेवून पुढील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले आहे. " अपीलकर्ता यांना माहिती पेक्षा केलेल्या तक्रार अर्जावर कार्यवाही बाबतीत विशेष रुची दिसते. याबाबतीत माहिती अधिकार कायद्यात अपीलकर्ता यांना इलेक्ट्रिसिटी OMBUDSMAN यांच्याकडे संबंधीत कार्यवाहीसाठी ग्राहक म्हणून आक्षेप असल्यास विहीत केलेल्या कार्यवाहीचा अवलंब करावा. सादर केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २६.११.२०१९ रोजी अधिक्षक अभियंता, नागपूर यांनी माहिती अधिकार अनुषंगाने सखोल चौकशी करुन सविस्तर अहवाल अपीलार्थीस कळविण्याबाबत निर्देशित केले. तसेच त्याबाबतीत एक स्मरणपत्र तयार करुन त्याबाबत अपीलार्थीस कळवून त्याची प्रतिलिपी कार्यालयास सादर करावी, असे कळविले होते. वरील पत्रव्यवहारासंबंधी कार्यकारी अभियंता, गांधीबाग, नागपूर यांच्याकडून आदेश प्राप्त झाल्याचा आत ७ दिवसात माहिती प्रदान करावी, तसेच चौकशी अहवाल सादर केल्यानंतर आजपर्यंत करण्यात न आल्याचा तपशील अद्यायावत करुन अपीलार्थीस कळविण्यात यावा" असे आदेशीत करण्यात आले होते.

तक्रारकर्ता यांनी आयोगाच्या उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी न झाल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) अंतर्गत दिनांक २१.०३.२०२३ रोजी आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये असे नमुद केले आहे की, "आयोगाच्या आदेशानुसार अद्यापपर्यंत कोणतीही माहिती

मिळाली नाही. त्यामुळे आयोगाच्या आदेशाची अवमानना झाल्यामुळे संबंधीतांवर कार्यवाही करण्यात यावी” अशी आयोगास विनंती केली आहे.

**युक्तीवाद/खुलासा**:- आज सुनावणी दरम्यान आयोगास सादर केलेल्या दस्ताऐवजानुसार, अधीक्षक अभियंता, नागपूर शहर मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या., नागपूर यांनी दि. १८.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, आयोगाच्या व्दितीय अपील क्र. १२७३/२०२० च्या आदेशानुसार कार्यकारी अभियंता, गांधीबाग विभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या दि. २६.०७.२०२३ रोजीच्या चौकशी अहवालाची मुळ प्रत तक्रारकर्ता यांना पाठविण्यात आली. सदर चौकशी अहवाल अर्धन्यायिक चौकशीचा भाग आहे. अर्धन्यायिक कामकजाचे स्वरुप असल्याने सदर चौकशी अहवालास विलंब झाला आहे. सदर तक्रारीवर दोनदा सुनावणी घेण्यात आली. परंतु तक्रारकर्ता सुनावणीस अनुपस्थित होते.

**निष्कर्ष**: सदर तक्रारीसंदर्भात सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की,
१.आयोगाच्या व्दितीय अपिल क्र. १२७३/२०२० रोजीच्या आदेशानुसार तक्रारकर्ता यांना दि. १८.०८.२०२३ रोजी चौकशी अहवाल पाठविण्यात आल्याचे दिसून येते, सबब आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.
२. तक्रारकर्ता सदर सुनावणीस अनुपस्थित असल्याने त्यांना सदर प्रकरणी स्वारस्य नसल्याचे दिसून येते. त्यामुळे तक्रार अर्ज निकाली काढणे क्रमप्राप्त ठरते.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर राज्य माहिती आयोग खंडपीठ * नागपूर *

(भुपेंद्र गुरव)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : २७.०३.२०२५**

29 MAY 2025

जा.क्र. 2551 दि.

SD E:\27.03.2025 तक्रार क्र. 92/2023- शब्बीर